जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - १८८ दिनांक -२२/०३/२०२५**

खंडणी विरोधी पथक ०२ पथक गुन्हे शाखा,पुणे शहर

## सराईत गुन्हेगार व तडीपार आरोपी यांच्याकडुन चार पिस्टल व आठ जिवंत काडतुसे जप्त

खंडणी विरोधी पथकास नेमणुकीस असलेले पोलीस उप-निरीक्षक गौरव देव व पोलीस अंमलदार अनिल कुसाळकर यांना मिळालेल्या गोपनिय बातमीचे आधारे व तांत्रीक विश्लेषणाच्या आधारे राजेश्वरी नगरी, आलोवेरी सोसायटी, वाघोली पुणे, येथे एकाच घरात तडीपार आरोपी १) अमन दस्तगीर पटेल, रा. बाकोरी फाटा, वाघोली पुणे, २) इशाप्पा ऊर्फ विशाल जगन्नाथ पंदी, रा.गोकुळ पार्क, बकोरी फाटा, वाघोली, पुणे ३)गोपाळ संजय यादव, राहत असुन ते दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने त्याचेकडे पिस्टल जवळ बाळगुन आहेत.सदर बातमीची खात्री करुन सापळा रचुन ते रहात असलेल्या फ्लॅट मध्ये छापा टाकुन चौकशी करुन घराची झडती घेवुन **आरोपीतांकडुन ४ पिस्टल व ८ काडतुसे असा एकुण १,६४,०००/-रू.चा जप्त केला आहे.**

यातील आरोपी **१)गोपाळ संजय यादव वय २४ वर्षे रा.वाघोली पुणे याचेवर दरोडा, खुनाचा प्रयत्न राईट असे एकुण २ गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल आहेत. २)अमन उर्फ मुन्ना दस्तगीर पटेल वय २३ वर्षे रा.वाघोली पुणे यांचेवर अहमदनगर येथे तसेच लोणीकंद पोलीस स्टेशन येथे आर्म ॲक्ट व तडीपार याप्रमाणे ३ गुन्हे दाखल आहेत. ३)इशाप्पा ऊर्फ विशाल जगन्नाथ पंदी, वय २४ वर्षे रा.वाघोली पुणे यांचेवर मोक्का, दरोडा,आर्म ॲक्ट, तडीपार, असे एकुण गंभीर स्वरुपाचे ५ गुन्हे दाखल आहेत ४)देवानंद शिवाजी चव्हाण वय २३ वर्षे रा मारुती आळी शिरुर पुणे.**

सदरची उल्लेखनिय कामगीरी मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर श्री.अमितेश कुमार मा.पोलीस सह आयुक्त,पुणे श्री. रंजनकुमार शर्मा, मा.अपर पोलीस आयुक्त गुन्हे श्री.शैलेश बलकवडे, मा.पोलीस उप आयुक्त गुन्हे श्री.निखील पिंगळे,मा.सहा.पोलीस आयुक्त गुन्हे -२,श्री.राजेंद्र मुळीक,खंडणी विरोधी पथक -२ पोलीस निरीक्षक छगन कापसे(अति.कार्यभार)पोलीस उप-निरीक्षक गौरव देव,स.पो.फौज.सुनिल पवार,पोलीस अंमलदार अनिल कुसाळकर,चेतन आपटे,अजिनाथ येडे,अमोल घावटे, अमोल राउत, सैदोबा भोजराव,सुरेंद्र जगदाळे,चेतन चव्हाण,दिलीप गोरे,पवन भोसले,प्रशांत शिंदे,आशा कोळेकर, रुपाली कर्णवर यांनी केली.


खंडणी विरोधी पथक -२ गुन्हे शाखा,
पुणे शहर